# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.

E-mail : desk10@dtemaharashtra.gov.in Internet : http://www.dtemaharashtra.gov.in


अतितात्काळ

कालमर्यादीत दि. २६/६/२०१९ पर्यत

जा. क्र. १०/एनजीपी/विद्यार्थी स्थलांतरण /२०१९/ ६८२

दिनांक : 24 JUN 2019

प्रति,

प्राचार्य,

सर्व अभियांत्रिकी स्वायत्त पदविका संस्था

विषय : शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांचे पहिल्या वर्षानंतर पाठयक्रम बदल त्याच स्वायत्त संस्थेत करण्याबाबत......

संदर्भ:-१) उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन निर्णय क्र.मान्यता-२०१९/(प्र.क्र ७७/१९) तांशि-५, दिनाक १७ मे २०१९

२) शैक्षणिक वर्ष २०१९-२० पोस्ट एस.एस.सी पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमाची प्रवेश नियमावली .

संचालनालयाच्या अधिपत्याखालील पुर्णवेळ पदविका पाठ्यक्रमांच्या प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्षाचे (अभियात्रिकी व तंत्रज्ञान, औषधनिर्माणशास्त्र व हॉटेल मॅनेजमेंट व कॅटरींग टेक्नॉलॉजी ) नियम संदर्भ क्रमांक २ अन्वये प्रसिध्द करण्यात आले आहेत. सदर शासन निर्णयानुसार तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील सर्व शासकीय / अशासकीय अनुदानित व विद्यापीठ संचालित शैक्षणिक संस्थांमधील अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र या पदविका अभ्यासक्रमाच्या स्वायत्त संस्थेतील विद्यार्थ्यांच्या त्याच स्वायत्त संस्थेत पाठयक्रम बदलाबाबत सदर संदर्भ २ च्या प्रवेश नियमावलीतील नियम क्रमांक १६ (१) व १६(२)(८) प्रमाणे कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत.

तरी सर्व स्वायत्त संस्थेतील प्राचार्यांनी शैक्षणिक वर्ष २०१९-२० च्या पोस्ट एस.एस.सी.पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमाची प्रवेश नियमावलीत नमूद केलेल्या नियमानुसार त्यांच्या संस्थेतील विद्यार्थ्यांचे पहिल्या वर्षानंतर संस्थेमध्ये पाठयक्रम बदलाबाबतची कार्यवाही ही दि.२६/६/२०१९ पर्यत संस्थास्तरावर करण्यात यावी. तसेच केलेल्या कार्यवाहीची माहिती दि.२७/६/२०१९ पर्यंत संबंधित सहसंचालक विभागीय कार्यालयांना आपल्या कार्यालयाचेस्तरावरुन कळविण्यात यावे.

( डॉ. अभय वाघ)

संचालक,

तंत्र शिक्षण,महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत- सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित